म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८४२

# …ीचा चांद

[ शिशुगीतांचा संग्रह ]

सं. काव्य. नं.



REFBK-0003976
REFBK-0003976

—भवानीशंकर श्रीधर पंडित.

# चवथीचा चांद

[ शिशुगीतांचा उत्कृष्ट संग्रह ]

कवि—भवानीशंकर श्रीधर पंडित, एम्. ए.

REFBK-0003976
REFBK-0003976

आवृत्ति १ ली

मुद्रक व प्रकाशकः—
बा. रा. मोडक, संपादक मुलांचें मासिक, नागपूर

किंमत ८ आणें

# अनुक्रमणिका

* या कवितांना इंग्रजीचा आधार आहे.


| | | |
|---|---|---|
| १ | प्रार्थना | १ |
| २ | चांदण्या | २ |
| ३ | आमचें घर | ३ |
| ४ | आई | ४ |
| ५ | दादाची स्वारी | ५ |
| ६ | नाचाचें गाणें | ७ |
| ७ | काऊ या! चिऊ या! | ८ |
| ८ | वनभोजन | १० |
| ९ | बाळाची बोली | ११ |
| १० | आई | १३ |
| ११ | * चिऊताईचीं पिलें | १४ |
| १२ | मायलेंकरें | १५ |
| १३ | वाघ्या | १६ |
| १४ | लपंडाव | १८ |
| १५ | अनुत्तीर्ण विद्यार्थी | २० |
| १६ | * कांहीं जलयानें | २२ |
| १७ | * लहानगें रोपटें | २३ |
| १८ | काऊ | २६ |
| १९ | बागुलबुवा | २७ |
| २० | मनी आणि मोत्या | २८ |
| २१ | आमचा बगीचा | ३० |
| २२ | चिमणा सरदार | ३१ |
| २३ | शहाणी बेटकुळी | ३३ |
| २४ | आईचें मन | ३५ |
| २५ | * नव्या नवरीस | ३६ |
| २६ | समजाविशी | ३८ |
| २७ | मनूताईचीं बाळें | ३९ |
| २८ | वारा | ४० |
| २९ | चांदोबा | ४१ |
| ३० | लबाड राजा | ४३ |
| ३१ | फेरीवाला | ४४ |
| ३२ | बोबडकांदा | ४५ |

# प्रस्तावना

True genius is nothing more than the power to be children again at will—

प्रौढत्वीं निज शैशवास जपणें बाणा कवीचा असे

—केशवसुत

जगांतील कोणत्याहि राष्ट्राच्या काव्यवाङ्मयाकडे पाहिल्यास शिशुगीतांचे दोन मुख्य प्रकार आढळतात. एका प्रकारांत कवीला स्वतःच्या प्रौढत्वाची जाणीव असते; परंतु, बालपणाच्या अवीट आठवणींना आणि भाबड्या भावनांना तो शब्दांच्या सूत्रांत गोंवत असतो. हीं **शिशूंवरलीं** गीतें होत. दुसऱ्या प्रकारांत त्याला स्वतःच्या वाढत्या वयाचा विसर पडलेला असतो; आणि, आपण एखादें लहान मूल आहों अशा भावनेने ज्या कल्पना सुचतील त्यांना तो कवितारूप देत असतो. हीं **शिशूसाठीं** लिहिलेलीं गीतें होत. पहिल्या प्रकाराचा नुसत्या वात्सल्याच्या भावनेशीं संबंध असल्यामुळे तो रचण्यास आयास पडत नाहींत; परंतु, दुसऱ्या प्रकारांत वात्सल्याची भावना आणि अद्भुतरम्य कल्पना यांचा समन्वय करावा लागत असल्यामुळे तो रचण्यास साधारण जड जातें. 'शिशुकौतुक,' 'अंगाई गाणें' (Nursery Rhyme), 'पाळणा' (Cradle Song), ह्या रचनाजाति पहिल्या प्रकारांत समाविष्ट होतात; तर, 'बाळबोल' 'अभिनय-गीत' (Action Song), 'संवाद' (Dialogue) ह्या जाति दुसऱ्या प्रकारांत अन्तर्भूत होतात. पहिल्या प्रकाराच्या जातींचे वाचक वयस्क रसिक असतात. दुसऱ्या प्रकाराच्या जाति बाल-रसिकांना रुचतील अशी अपेक्षा असते.

प्रस्तुत संग्रहांत बहुतेक दुसऱ्या प्रकारच्या जातींचाच समावेश केला आहे. कवितांची निवड करतांना त्यांच्यातील कल्पना सात ते चवदा वर्षांच्या वयांमधल्या मुलांना सहज सुचतील व वाचतांना आपोआप समजतील या दोन गोष्टींकडे विशेष लक्ष्य पुरविलें आहे. कविता लिहितांना मुलांना विनोद विशेष आवडतो, हें सत्य दृष्टिआड केलेलें नाही. कांही गीतांत अभिनयालाहि भरपूर वाव ठेवला आहे. मुलांना पाळीव प्राण्यांविषयीं वाटणारा जिव्हाळा ध्यानांत घेऊन त्यांच्यासंबंधीं कांही गाणीं जुळविलीं आहेत. त्यांच्या नादलुब्ध कानांना भुरळ पाडतील अशाच गोड शब्दांची योजना करण्याची शक्य तेवढी खबरदारी घेतली आहे. ह्या दृष्टींनी ' बाळाची बोली, ' ' शाहणी बेटकुळी ,' ' दादाची स्वारी,' ' मनी आणि मोत्या ' व ' वनभोजन ' हीं गीतें पारखून पाहवींत.

हीं गीतें रचतांना मला ' आनंद ' मासिकाचे संपादक कै. वा. गो. आपटे यांचें उत्तेजन मिळालें होतें. आज ही कृति पाहवयास ते विद्यमान नाहीत, याचें वाईट वाटतें. येथील सुप्रसिद्ध ' मुलांच्या मासिका ' चें विद्वान् व उत्साही संपादक रा. बा. रा. मोडक यांनी ह्या कविता प्रसिद्ध करण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेऊन मला कायमचे कृतज्ञ केले आहे. त्यांच्या सहकार्यावांचून हा संग्रह बाहेर निघाला नसता. पुस्तकांतील चित्रें आमचे मित्र रा. ना. रा. वकील यांनी काढलीं आहेत. त्यांचा मी आभारी आहे. शेवटीं माझी ही कृति रसिकांनी गोड मानून घ्यावी अशी विनंती आहे.

धनतोली; नागपूर
सोमवार ता. १३ नोव्हेंबर ३३ } भवानीशंकर श्री. पंडित

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६९६४०
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. क्रमांक नं. १०८७०
ता. १-१-३४
ठाणे.

# प्रार्थना—

चाल—( आनंद कंद ऐसा )

हे नाथ दीनबंधो ! भावें तुला भजावें
यावांचुनी न आह्मा बाळांस अन्य ठावें !
अज्ञान मूढ आह्मी
आहों विनम्र पायीं
तूं होउनी कृपाळू आम्हांस ज्ञान द्यावें !
—आहों अपंग देहीं
सामर्थ्य लेश नाही
त्वां सर्वशक्तिमंतें आह्मांस वागवावें !
तूं मायबाप आह्मी
तान्हीं मुलें तुझीं हीं
वात्सल्य पूर्ण तूझें आह्मांवरी असावें !

माझगांव

ता. २३-१०-३३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ता. क्र. ३०५७६

# * * चांदण्या * *

आभाळाच्या अंगणीं
लुकलुके चांदणी
रात्र थोर माउली
काय तिची ही बाळी?

खेळायाला पातल्या
एकामागे एक या
कित्ती कित्ती मैत्रिणी
मोजाव्यात त्या कोणी ?

× × × × × ×

राजयाच्या मुकुटीं
शोभेल ही गोरटीं !
हिरकणी ही कोणी
जडवाना कोंदणीं !

बाबा दादा लोटती
आई ताई भेटती
आळवोनी ते देवा
घेती सुखें विसावा

\+ \+ \+ ÷ ÷ ÷

सारखी ही हासते
टकमका पाहते
'या, हो! या, हो! डोळ्यांहीं
खुणविते कोणा ही ?

शीण सारा झाडाया
जोम पुन्हा वाढाया
आपणही जाऊं या !
आता यांना खेळूं द्या !

नागपूर
ता. ९-९-२३

# आमचें घर

( दिंडी )

वाडवडिलांची आमुच्या हवेली
आज कालाने जीर्ण जरी झाली
तरी आहे आह्मांस जीवप्राण
माय ह्मातारी दूरवील कोण ?
जरी तुळया वाश्यांस कीड लागे
खांब कलती, छत कुजें वृष्टियोगें
तरी सारे दृढ धरूं सांवरून
वृध्द माउलिची काळजी कुणा न ?
पूर्वजांना सांभाळिलें तियेने
दिलीं त्यांना विश्रामवासदानें
सिध्द आजहि-! जरि रूप चंद्रमौली
अशा कालीं तिज कोण दुजा वाली !
रुधिर ज्यांचें आमुच्या रोमरोमीं
पिंड ज्यांच्याविण आमुचा निकामी
बापदादे ते नांदले जिच्यांत-
दूर आह्मी जरि-प्राण हे तिच्यांत !
दैवयोगें जरि अंतरलों तीतें
तरी नाहीं तुटणार पूर्वनातें
ठेवुं तिजवर निरपेक्ष सत्य लोभ
सत्य लोभ न कधि इच्छि लेश लाभ !

पुणें ४-५-२६

# आई

दिंडी



दूर तिकडे शेतामध्ये खपे ती
चित्त राहें परि खोपट्यासभोंतीं
तिचा राजस राजा निजे मजेंत
तरुस्कंधीं बांधल्या बंगलींत.
चिमाताई भक्ष्यार्थ लांब जाती
चित्त आहे तरि कोटरासभोंतीं
पिल्या आणिक पिलि सारखी तयांची—
वाट बघती वासून सान चोंची.

जरी आह्मी असलों कसें कुठेही
विश्वजननी! तरि संग तुझा राही
चालवीते आह्मांस तुझी माया
तुझ्या मायेविण जन्म जगीं वाया!

पांचगणी २८–५–२६

---

## दादाची स्वारी (अंबा पिकतो–ओळीप्रमाणें)

" पहाटे जेव्हां
चहाच्या वेळां
तोंड धुण्याचा
येई कंटाळा
हात उगारी!
दादाची स्वारी!!
घेई पुस्तकें
बसे वाचीत
जाऊनी तेथे
लावितां हात
ये अंगावरी!
दादाची स्वारी!!
जेवण चालें
कांहीं लागतां

मराठी ग्रंथ संग्रहालय

लागवेगीं तें
तेव्हा मागतां
डोळे वटारी !
दादाची स्वारी !!
तीन सांजेला–
जातां फिराया
सांगतां कांही
विकत घ्याया
नाक फेंदारी !
दादाची स्वारी !!
रागारागानें
हट्ट घेऊनी
बसतां दूरीं
फुरंगटुनी
चपेटे मारी !
दादाची स्वारी !!
रात्रीं झोपाया
दमूनी परी
पडावें जेव्हा
बिछौन्यावरी
पोटाशीं धरी !
दादाची स्वारी !!

उमरावती २३–४–३१



# नाचाचें गाणें

( नदीच्या पैलारू )

“ पोरींनो! या ग या
नाचूं थय्या थय्या
हातीं घालूं हात
फेर धरूं गात
ताल देऊं पायीं
घूमवूं ही राई
× × ×

नाचती या कळ्या
पाकळ्या-साखळ्या!
वाजती हलके
कोण ग! त्या ऐके ?
गोड तो आवाज
ऐकल्ये मी रोज
× × ×

हौदाच्या पाण्यांत आता सोडूं हात
नाचती मजेंत टाळ्या देऊं गात
हासऱ्या तारका— फिरूं गोल गोल
देवांच्या बालिका ! रमूं सारा वेळ
नाचूँ या आपण हासूं या! खेळूं या!
धरोनी रंगण नाचूं थय्या थय्या!"

× × ×

नागपूर ४–९–३९

---

# काऊ या ! चिऊ या !

( झिम्मा खेळू या )

काऊ काऊ या! रे! चिऊ चिऊ या!
खेळक्या या बाळासवें खाऊ खाऊं या !
मांडूनीया ताटपाट
मोठा करूं थाटमाट
आळीपाळीने आणिक गाणीं गाऊं या !
भाजीला ना लाऊं हात
मात्र जेऊं दूधभात
त्याही आधी करूं गट्ट गोड आऊं या !

येथें बरी निप्टी चिप्टी
मामाघरीं तूप रोटी
पिऊं पाणी खेळूं आणि च्याउम्याउ या !
या रे ! काऊ या रे ! चिऊ
नवे नवे खेळ दाऊं
धावाधावी, शिवाशिवी, लपूं जाऊं या !
उडूं उंच भुर्रदिशी
हिंडूं खूप दाही दिशीं
येतां माऊ किंवा बाऊ दूर धाऊं या !

नागपूर ११-१२-२९

## वनभोजन

(अंबा पिकतो)

वनभोजना
चला, जाऊंना
सर्वां संगें घेऊं, मागे ठेऊं ना कोणा
गुंजांच्या माळा
घालोनी गळां
ताल देत, जाऊं गात, हाकीत मेळा
खेळीमेळीनें
आळीपाळीनें
जागा झाडूं आणि वाढूं केळीचीं पानें
पोट भरोनी
खाणें खावोनी
खेळूं खेळ सारा वेळ, करूं पोहणी
सांजेचा वारा
घालतां फेरा
भरभरा घरोघरा फिरूं माघारा

अजमेर २५–६–३०

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
ठाणे

# बाळाची बोली

[ भाव भरारे ! ]



--"आई ! आई !
बोलतो कसा हा बाई ?
ह्मणतो 'मं मं' भूक लागतां
'पापा' करतो पाणि मागतां
ह्मणतो 'दू दू' दूध पाहतां
हंसतो 'हीः हीः'—

मराठी ग्रंथ संग्रहालय

तेल माखतां करि ' तो तो तो '
न्हाउ घालतां 'बुडुबुडु ' ह्मणतो
ह्मणतो जेव्हा झोपीं येतो--
' गाई गाई '—
मला पाहतां करतो 'ता--ता-'
'बा--बा' करतो बाबा दिसतां
मात्र घोकतो उठतां बसतां-
' याई याई '—
यास पाखरें 'चिउ' वा 'काऊ'
'माउ' मांजरी, मुंग्या ' बाऊ '
फळें, मिठाई--'खाऊ,' 'आऊ '
हम्मा ' गाई '—
'टण् टण्' ह्मणतो सायकलीला
ह्मणतो ' पों पों ' मोटारीला
आणि बोलतो आगगाडिला-
' भप्भप्ऽईई '—
किती मजेची याची बोली
असे आपुली किती निराळी
म्हणुनी बोले तिन्हीत्रिकाळीं
एकच हा ही. "— नागपूर २५-८-२९

## आई

( आनंदकंद-गज़ल )

‘ आई ’ असे तरी या नांवांत काय जादू ?
‘ आई ’ वसे तरी या नांवांत काय स्वादू ?
सौंदर्य कोणतें तें नांवांत या झळाळे ?
माधुर्य कोणतें तें नांवांत या उमाळे ?
राहे द्वयाक्षरीं या पावित्र्य काय दिव्य ?
आहे द्वयाक्षरीं या वैचित्र्य काय भव्य ?
नांदे द्वयाक्षरीं या आल्हाद कोणता तो ?
कोंदे द्वयाक्षरीं या आनंद कोणता तो ?
‘ आई ’ मधूर का हा कानांसि शब्द वाटे ?
‘आई’ सबाष्प का हा कंठांत शब्द दाटे ?
तें काय यांत बोला ! ज्याला जगीं न मूल्य ?
तें काय यांत खोला! ज्याच्या जगीं न तुल्य ?

× × ×

‘ आई ’ द्वयाक्षरीं या प्रीती वसे अनन्य !
पाहीं जगीं कुठेही तैशी दिसे न अन्य ! !

जोधपूर १–९–२३



# चिऊताईचीं पिलें--

( दिंडी )

" अहा ! सोनुकलीं सान पिलें छान
जुळीं भावंडें एक ! दोन !! तीन !!!
शेवरीच्या उबदार बिछान्यांत
माऊलीला बिलगून झोपतात
नसे यांना मुळि काळजी कशाची
कोणतेंही नच दुःख यांस जांची
बाप चारा आणून देइ गोड
माय पुरवी दररोज नवें कोड

असे तुमचें घरकूल उंच उंच
नका बाळांनो ! डोकवूं उगाच
तोल जाउन जर खालती पडाल
पंख इलुसे-त्यांनीं कसे उडाल ?
दिवस कांहीं घ्या थोडका विसावा
जोर येइल पंखांत खूप तेव्हां
स्वच्छ होइल आभाळ उजेडून
गात चिव चिव चिव भुरें जा ! उडून

उमरावती २२-४-३१

---

## मायलेकरें

[ शार्दूलविक्रीडित ]

रात्रीं कीं अपरात्रिं, ठाऊक कुणा-!
केव्हा-! कशी-! हीं फुलें
वेलींच्या-वनराणिच्या उपजलीं
पोटीं तियेचीं मुलें
तीं वेली जवळूनि आपखुशिनें
जातील कैशीं बरें ?
आईपासुनि वेगळीं कधि तरी
झालींत का लेकरें ?
सोनेरी पिवळ्या प्रभातकिरणीं
मातेचिया भोंवतीं

होतीं खेळत आपसांत छकुली
नानापरीं खेळ तीं;
वायूच्या झुळुकेसवे भुरभुरा
कांही परी त्यांतलीं-
गेलीं दूर उडूनि! कांहिं पडलीं-
मातीमधें भूतलीं !!
पांगापांग सवित्रिपासुनि अशी झाली तयांची खरी !
सौगंधें चहुफेर सद्यश तिचें नेले तयांनी परी !!

जोधपूर २-११-२४

---

## वाघ्या

( राघावर मधु मिलिंद )

सोडुनिया जेजुरी
अला रे! वाघ्या ओटीवरी
डोंई त्याच्या मंदिल झळके
लफ्फे मधुनि काढिति डोके
भंडाऱ्यानें कपाळ झाके
काळा गंडा करीं !
अंगरख्याला नसतीं बटणें
सुतळीचीं त्याजागिं वेष्टणें
डगला चढवी वरि ऐटीनें
पंचा खांद्यावरी !

काखेमाजीं लोंबे झोळी
धोतर लोळें पायांखालीं
भंडाऱ्यास्तव वेळोवेळीं-
हलवी व्याघ्रांबरी

कथी भाकितें खोटींनाटीं
साध्याभोळ्या फसवी कपटी
पैशासाठीं सर्व लटपटी
करितो नानापरीं

मुखें सारखी चालवि वटवट
पाठीमागे लावी कटकट
मधेंचि कडकड चावी मणगट
धरणें दारीं धरी

जनांस जमवी बाजुंसि चारी
'येळकोट' करि 'जय मल्हारी'
खंडोबाच्या नांवें फेरी
घरोघरीं हा करी

गात पवाडे घंटि वाजवी
खुबीखुबीनें 'सवाल' सुनवी
शिव्याशाप द्या, पाय न हलवी
मिळवी थोडेंतरी

अजमेर २३-१२-२२

## लपंडाव



आनंदी

आनंद

गडे !

—" यू यू यू यू पपी पपी
खेळूं आपण लपाछपी
लपेन मी सांदींत असा
हुडकुन मज तूं काढ कसा!
येउन मागे
धांवत वेगें

ओढी सोगे;
धरून ते तोंडांत गड्या !
आनंदें मग मार उड्या,
माय तुझी चंपूताई
बनेल ती खाशी दाई
राज्य तुझ्यावर कायमचें
वदेन मी ‘ सुट्ट्यो ’ वाचें
येशिल शोधत
तेव्हा हासत–
जाउन धांवत–
शिवेन मी दाईस पहा !
भू भू भू तूं भुकत रहा.”

नागपूर ११–९–३२



## अनुत्तीर्ण विद्यार्थी

( चंद्र चवथिचा )

ऊर हादरे
कंठ गहिवरे
घुटमळती शब्द आंत-जीभ चांचरे
हृदय तळमळें
आणि हो खुळें
डबडबतीं पापण्यांत तापलीं जळें
नासिकांतुनी
वाहती झणीं
सुसकारे ऊन ऊन, वृत्ती हो सुनी

जीव बावरा
चालला घरा
दुःख कुचंबून हाय! होय घावरा
जाणिवेमुळे
दुःख तें सलें
पडतीं सडकेवरून मंद पाउलें
'हाय! पारखे—
जाहले सखे
अनुभवणें त्यांच्यासह कुठुन नव सुखें?
पाहुनी असें
वदन दीनसें
होईल मातापित्यांस अंतरीं कसें?
कष्टुनी फुका
खर्चिला रुका
गेलें जें वर्ष फिरून तें मिळेल का?'

नागपूर ३०–८–३०

३८०८६

# कांहीं जलयानें ( दिंडी )

राजवाड्यासारखी अवाढव्य !
जळीं वसणारी पेठ जणू भव्य !
—पृथ्विपर्यटनायोग्य आगबोट
स्वेच्छ विहरे विस्तीर्ण सागरांत.



वृषभशृंगोपम अर्धचक्रकार,
चतुर्थीची कीं चारु चंद्रकोर !
—तिच्यापेक्षा अत्यंत रम्य डोंगी
पारदर्शकशा संचरे तडागीं.

परी यांच्याहुनि रम्य नसे थोडी
श्याम मेघाची काल्पनीक होडी
फिरे वायूसह स्वैर, चंचला जी-
नभोगंगेच्या नीलजलामाजी.

आइ जेव्हा बाळास भरी रागें
सहज तेव्हा तल्लोचनीं तरंगें-
अश्रुबिंदूचें तारुं जें सुरम्य-
येइं त्याचें एकासही न साम्य

नागपूर १४-४-२६

---

## ल्हानगें रोपटें

[ अंजनी गीत ]

वर्षाकालीं खोल भूतळीं
वनस्पतींचीं बीजें रुजलीं!
जन्मा येईं दाट तृणदलीं
बाळ कुणी तान्हें

त्याला नियमित निशा माउली
बसे घेउनी काळ्या अंचलिं
हिमबिंदूंनी न्हाऊं घाली
परतायापूर्वी !

सुंदर हिरव्या मखमालीची–
लुसलुसणाऱ्या मउ वाफ्याची !
शिरीं चढवुनी उंची कुंची
झोंपीं जाई तें

उजळे भवतीं ! तरी एकटें
स्वस्थपणें तें बाळ धाकुटें
वेडें बगडें सरळ रोपटें
पेंगत डुलक्या घे

हासत हासत येई वारा
झुळुकेसरशीं डोलवि त्याला
हलवुनि हलवुनि उठवि भरभरा
तें न तरी जागें

रविरायाही लांबवुनी कर
करी गुदगुल्या जरि वरचेंवर
शांतपणें तें तरि डाराडुर
कुंचिमधीं झोंपें

–"ऊठ छबुकड्या ! ऊठ सवगड्या !
खेळुं बागडूं ये ! मारु उड्या "–
पाखरें अशा सुराने खड्या
बोलाविति त्यातें

डोळे करुनि तोंच किलकिले
आनंदाने बाळ तें खुलें
पाखरांसवे गाई ताले
देवाला गीतें

× × ×

वर्षे वर्षावरी लोटलीं !
बालमूर्ति ती आता कुठली ?
उंच वाढुनी पानें फुटलीं–
थोर तरु तें हो !

आता अर्पी छाया सकलां
प्रेमभराने देइ फुलफलां
उपकारें करि ऋणी जगाला
लाजवि कर्णातें !

'रामु' आमुचा सान आज जरि
उद्या जाणता होउनिया तरि
झीज सोसुनी परार्थ यापरि
काढिल नांव जनीं !

नागपूर १४–१–२६

## काऊ

—“ ये ! काऊ
घे खाऊ
खा दाणा,
वाटाणा
पी पाणी
जा रानीं
का डोळा—
काणेला
लवे ना ?—
हाले ना ?
काय तो—
हेरतो ?

हस्माला
लागला
घाव तो—
वाहतो
टोचसी
तूं त्यासी
हो कसा—
नाहीसा
नाहीं हा !
खाऊ हा
मी माझा—
देत. जा !”

उमरावती
८-११-३३

## बागुलबुवा-- [ सुखकर्ता दुखहर्ता ]

सवंद वासून क्रूर जाभाडा
अक्राळ विक्राळ दावीत दाढा
लळ्लळ्ती हल्वीत जीभ दूघडा
येसी कशासाठी बागुला! द्वाडा ?
जा जा रे! जा जा

पिंजारसी झिंज्या, काढिसी डोळे-
त्यांच्यांत नाचतीं लाल बुबूळें
घेसी गुंडाळुन काळें कांबळें
भीती दाखवून नेसी का बाळें ?
जा जा रे! जा जा

शहाणें आमुचें तान्हें बाळ हें
पापण्या झाकून झोपत आहें
येऊं नको आता लांबच राहे
पाय काढ! नीघ! जा लवलाहे!
जा जा रे! जा जा

नाही तर तुला करील 'हात'
पंज्यानें ओढील झिंज्या रागांत
जोराने हाणील पाठींत लाथ
उगाच पाडील बत्तीस दांत
जा जा रे! जा जा

नागपूर २६-१२-२९

# मनी आणि मोत्या

मनी आमुची भाटी
आहे मोठी चोरटी
मुलूखाची खादाड
द्वाड आणि बेरड !

खाली कोठींत जाई
झोंप निवांत घेई
लपे अंधारामाजी
तेवे डोळ्यांत तेजी



हिंडे बंगला सारा
धुंडी कोनाकोपरा
खाई झाकली साय
काढी हलके पाय

मिशा पिंजारी रागें
शेप ताठवी मागे
'म्याँव म्याँव' ओरडे
नखें वे ओरखाडे

वाघोबाची ‘ मावशी ’
वैर ईचें ‘ मामा ’शीं
नको ईची सोबत
दुष्ट कपटी जात !
परी आहे हा मोत्या
किती ईमानी जात्या
नसे कशाची खोड
भारी स्वभाव गोड !
दारीं बसे बिचारा
देई खडा पहारा
खाई दिली भाकरी
नेमें करी चाकरी

कधीं ये ना घरांत
सदा राहे जागत
काळ्या रातीं बेराती—
फिरे बंगल्याभोंतीं
प्रेमें अंगास चाटी
लाडें वारी शेपटी
मोदें नाचे, किंचाळे
खेळे करीत चाळे
याचें सर्वांशीं पटे
मात्र मनीशीं फाटे
मैत्री याची चांगली !
खरी विश्वासू कुळी !

ग्रंथ संग्रहाल
स्थळ प्रत
नं.
ता.
ठा पो.

# आमचा बगीचा

[ आनंदाचा कंद हरि हा ]

छान आमुचा फळांफुलांचा बागबगीचा पाहुनी
आनंदानें कुणा जनाचें जाई ना मन मोहुनी ?
जिकडे तिकडे डुलतीं रोपें हिरवीं हिरवीं गार हीं
जणू वारिती चवऱ्या हातीं उंच तरु उभे राहुनी !
किल्‌बिल किल्‌बिल रावे, बुल्‌बुल, साळू, मैना बोलती
गाणें मंजुळ गाई झुळझुळ पाटाचें जळ वाहुनी
तऱ्हेतऱ्हेचीं फुलें उमलतीं रंगीबेरंगीं किती !
उठुनि पहाटें घेति सानुलीं दंहीवरानें नाहुनी
झेप घालती त्यांच्यावरतीं भृंगे आणि चितूर हे
घेति सुगंधित वातावरणीं मनमानेतों पोहुनी
कल्लेवाला माळी काळा मोटेवरती बैसुनी
आंजारी गोंजारी प्रेमें बैलजोडिला वाहुनी
नको कुठेही दूर जात्रया रोज रोज यावें इथें
दुजी मनोहर जागा सुंदर आहे तरि का याहुनी ?

# चिमणा सरदार

[ अङ्कुर ]

“ किति सांगु गडे ! तुजसी याच्या खोड्या
आहेत तशा का थोड्या !
जर सांगाया बसेन त्या एकेक
दिवसही पुरेल न एक;
तिकडूनि रणीं जाणें झालें जेव्हा
हा सर्व निघाला तेव्हा
किति सांगितलें धाकाने, प्रेमाने
परि ऐकेनाचि कशाने
सवगडी असे नित्य अता जमवीतो
लुटपुटी लढाई लढतो
करिं घेउनिया काठीची तलवार
दारांवरि करितो वार
करितो जरिच्या टोपीची दृढ ढाल
करितात वार वरि बाल
या गुडघ्याचा, बाळांच्या पाठीचा
हय बनवुनि हाणितो टाचा
ताईत गळ्यांतिल माझ्या
जीवाचा प्यारा कलिजा

वतनाचा चिमणाराजा

आशि करितो गे ! नरवीरांवर ताण

'बापसे सवाई' जाण !

तिनसांजेला बैसुनि तट्टावरती

फिरण्याला जातो भंवती

त्यावेळीं ज्या खोड्या करितो कांहीं

नच पुसणें बाई ! बाई !!

दुरि घालवुनी देतो मोतद्दारा

मग पळतो सैरावैरा

वरि फांद्यांशीं घेतो बाई ! झोंब्या

तोडितो फळें लिंबोण्या

ठाकतो कधीं जाउनि हत्तीपुढती

नाहींच कशाची भीती !

असले याचे बघतां बघतां खेळ

झरझरझर जातो वेळ

गे ! सजतो हा पुरापुरा सरदार

डोळ्यांस सुखवितो फार

जरि दिसण्याला गुलाम असला छोटा

अकलेने आहे मोठा

ताईंत गळ्यांतिल माझ्या
जीवाचा प्यारा कलिजा
वतनाचा चिमणा राजा
उरिं धरुनि असा जेव्हा दुडुदुडु धावे
मधु मुके मटामट घ्यावें ! ”

जोधपूर ६-१०-२३

# शहाणी बेटकुळी

[ तुह्मी चला हो ! वरमायी ]

गे ! तूं शहाणी बेटकुळी
राणी पाण्यामधली !
गादी चिखलाची बरवी
चादर हरळीची हिरवी
बससी तूं वर उकीडवी–
डोलें सांजसकाळीं
माती चाखुनि पारखसी
डोळे वरखाली करिसी
दुडकत दुडकत वा कुदसी–
डबक्याच्या भंवतालीं.

नांवें ठेवावीं तुज कुणी ?
असती कितीतरी तूं गुणी,
गासी डराँडराँ गाणीं-
रात्रीच्या अवकाळीं.



वेगीं पाण्यामधिं लप! जा!
दादा नेईल कॉलेजा,
भरतिल मांडीमधिं माझ्या-
वा मुंजीच्या वेळीं.

ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं.
ता.

## आईचें मन

[ देस ]

नजर फेक मागे बघ ! वळुनी
जननी पळते धरण्या अजुनी
          आगगाडि ही वेगें धावे
          टाकित गांवामागे गांवें
          किती तयांची घ्यावीं नांवें !
बघ ! तरी पळे धरण्या जननी
          रान भयंकर !—कसे वाकडे
          पहाड बघती वासुनि जबडे !
          जागजागिं तरु, सरिता, ओढे
बघ ! तरी पळे त्यांतुनि जननी
          वाव जिथे नच मिळतो किरणां,
          जिथे न जाते कवीकल्पना,
          पुरेवाट हो पळतां पवना
अदृश्यीं पोंचे त्या जननी
          घालुनि ती मायेची पाखर
          जिवापार तुज जपे अनावर
          मायेची जागीं माय खरोखर
एक ती ! न दैवत तिजवांचुनि

अजमेर ८-९-२२

## नव्या नवरीस---

[ राधाधर मधु मिलिंद ]

आला गे ! पाहुणा
ऐक, हळु हाक मारि तो कुणा
ठोठावी बघ ! दार हालके



आंत फटींतुनि हळुचि ढुंके
ओठावरती शब्दही मुके-
धडपडती भाषणा
बघ ! ठोठवणें येई जोरा

उतावळा बहु होइ विचारा
जा, गे! आता उघडी दारा
जागिसि खाणाखुणां

उरांत का गे! भरली धडकी?
ऊठ, उशिर का तडकाफडकी?
बघ! वाटे तर उघडुनि खिडकी-
सर्व आणि क्षितिजणां

गोंधळुनी अशि का गडबडसी?
जा, जा, लवकर असशिल तैशी
विचार नच करि,-कोठें, कैशी-
करि मग त्या जेवणा

भांग, पदर तें ठीकाचि कुंकूं
जाया मग का आता कांकूं
लाजुं नको गे!, कैशी खोकूं,
भेटवि त्या आपणा

समजुं नको गे! संध्याकाळीं
भूतबीत हें येइं अवेळीं
अडकविण्याला तुजला जाळीं
उलटें भुलतें गुणां

आड उभि रहा, दारा उघडुन
बोले तर दे उत्तर वाकुन
भिऊं नको गे! त्याला पाहुन
वाजवुनी कांकणां

अजमेर १७-१२-२२

# समजाविशी—

ओवी

—"कोण धावता धावता
उंबऱ्यांत आदळला ?
काय उंदीर पळाला !
ऊठ, राजा ! कोपऱ्यांत
पडला तो पहा पैसा,
आण उचलून कसा.
थांब, ताई ! आता तुझें
बांधू उन्हामध्यें घर
आणि देऊं खूप मार.
मोठा लागला ठसका
पहा ! वर बसे सासू
खुसूखुसू आलें हसूं."

उमरावती २३-१०-३१

# मनूताईचीं बाळें

कोठारांत मनूताई
माळ्यावर जागा घेई
तेथे तिला होतीं बाळें
बंद त्यांचे दोन्हीं डोळे !
'म्यॉऊ म्यॉऊ' मीयावतीं
'दूदू' प्याया धाव घेतीं
माऊलीच्या कुशीपाशीं
झोपतीं तीं राजीखुशीं !
नका त्यांना हात लाऊं,
बळें बळें दूर नेऊं
किंवा नका मारूं धप्पा !
रागावेल देवबाप्पा !

नागपूर २८-२-३२

# वारा

काळा काळा
मट्या आला
नीज बाळा
लाव डोळा.
-ह्मणतां, "ने"
केले त्याने
हात लांब
बोले, "थांब!"
दारावरी
लाथा मारी
देई थापा
अरे ! बापा.

-नको रडूं,
गडबडूं
-काढत ही-
कडी नाही.
मोठ्याने तो-
आरडतो,
आत आला
दिवा गेला
आता खोली
काजळली,
गूपचूप
बाळा ! झोप

नागपूर २०-१-३३

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणें.

## चांदोबा

( झिम्मा खेळुं या )

चांदोबा हाले बाळे ! चांदोबा डोले
चळें बळें मिचकावी हासून डोळे
चांदण्या या मधमाशा—
गुंजनांत गुंग कशा !
गोल लांबोडा हा शोभे तयांचें पोळें
तारकांचीं फुलें कितीं
सभोंवतीं चकाकतीं
फूलवाडींतून त्या हा एकला चाले
जमवून तारे मेळे—
उभे वेगवेगळाले
आळीपाळीने हा गडी त्यांच्याशी खेळे
किरणांचे धागे दुवे
विश्व त्यांत डुलें जवें
रेशीमाच्या काढण्यांचा दोला कीं झुले !
किर्र किर्र घोरे रात्र
घेती झोप वस्तुमात्र
तरी याचे आभळांत चालती चाळे

कोठवरी जागी राहूं ?
आणि याच्या लीला पाहूं
गारवून दोन्ही डोळे जाहले ओले

आळस ये, नेत्रापातीं-
आपोआप पांगुळतीं
पुढ्यामाजी नीज माझ्या आता वेल्हाळे!

नागपूर २०-४-३२



# लबाड राजा

[ चाल:—पहा माझी बेबी किती० ]

"पहाना ए ताई ! कसा लाडका राजा । तुझा । लाडका राजा
पापा घेऊं जातां माझ्या ओढतो झिंज्या । वेगें । ओढतो झिंज्या!

तोडूं का ग ! आता याचा मी गालगुच्च्या । अस्सा मी गालगुच्च्या
ओरखाडे घेतो भारी नखांनी लुच्च्या । छे! हा । नखांनी लुच्च्या!

चिमुकले हात दोन्ही धरूनी ठेऊं । कीं हे । धरूनी ठेऊं ?
बाई! बाई! हिरड्यांनी लागतो चाऊं । खुळा । लागतो चाऊं !

डोसक्यानें गुदगुल्या करूं का पोटा । याच्या । करूं का पोटा ?
लाथाडतो पाउलानीं लबाड बेटा । मोठा । लबाड बेटा !

रागें रागें वटारूं का डोळे मी गडे । याला । डोळे मी ? गडे !
खुपसाया बोटें सारीं सारतो पुढें । पाजी । सारतो पुढें !

आरडूं का अंगावरी ? धाक दाऊं का । बोल! । धाक दाऊं का ?
काय त्याचें गुलामाला ! हासतो मुका । फुका । हासतो मुका !

देऊं का या जागेवरी चापट अशी । हळु । चापट अशी ?
नको बाई ! काय नेम करायाचा 'शी' । कोठें । करायाचा '-' !

नागपूर ७-९-३३

## फेरीवाला



चाल
चला सुटी झाली

खरोखरी किती । मजा करी फेरीवाला
फिरे दिनभरीं
नच बसे घरीं
फिरण्याचा त्याला न कंटाळा
उजाडलें न तों
पडे बाहेर तो
ढकलीत पुढें हातठेला
रस्तोरस्तीं फिरे
गांठी नाके सारे
दर एक शोधी गल्लीबोळा
ठाके दारोदारीं
पाहे खालींवरी
पुकारही करी वेळोवेळा
विकी झुणझुण्या,
कांचमणी फण्या,
रबराचे चेंडू, पोतमाळा
उन कडकडो !
किंवा पाणी पडो
नियमाला न दे कधीं टाळा
रोज वाटे मला
व्हावें फेरीवाला
सदाकदा मागें नको शाळा

# बोबडकांदा

[ नृपक्षमता ]

(पात्रें--बोबडा बाळू, वय ६ वर्षें व त्याचा दादा, वय १४ वर्षें.

स्थळ--घरामागील छपरींत बाळू आपला तोडका मोडका खेळ अस्ताव्यस्त पसरून सोबत्यांशी खेळत आहे. इतक्यांत दादा बाहेरून येतो व त्याची खोडी करतो. )

बाळू--( उसळून ) 'नाही कां ऐतत दाद्या!'

दादा--( त्याच्या आवाजाची नक्कल करून )

'वा ले! वा बोबदतांद्या-आमुच्या'

बाळू--( रागाने ) 'मी थांगूं का आईला?'

दादा--( शांतपणानें ) 'जा थांग बोबद्या बाला-लाडक्या'

बाळू-( मोठ्यानें ओरडून) 'बघ बय ना गऽए आई!

हा दाद्या ऐतत नाही-थालखा

(रडका आवाज करून) मालतो-मला लदवतो-आणि-चिदवतो

उगिच चौंगिच

मीं खाल्लं कायतालि याचं?-थांगना?'

दादा-( खिशांतील बिस्कीट दाखवून )

'खाल्लें तूं पेपरमीट

आणखी गोड बिस्कूट-नाहि का?'

बाळू–( लाडाने ) ‘देतो का आनिक दादा ?’

दादा–( वेडावून ) ‘जा आईपाशीं मादा–आपुल्या’

बाळू–( त्याला बिलगून) ‘कलतोस असें का दादा !
–नाही का बोबदकांदा–मी तुदा ?’

दादा–( त्याला झिडकारून व डोळे मिटून )
‘छे! सोड–जा कुठे आड–नको हे लाड
चिडका बिब्बा
अपुल्याला नलगे बाबा–हा असा’

बाळू–( तिरस्काराने ) ‘जा ले ! जा दाद्या पाद्या’

दादा–( हसून ) ‘चिडला का बोबडकांद्या–शेवटीं
जो चिडेल त्याला काही
देणार मुळी मी नाही–सांगतों’

बाळू–( जवळ येऊन ) ‘दे नाहीं मी चिदनाल’

दादा–( वेडावून ) ‘बोबदे एकदा बोल–बोलना
(बाळू रडकुंडीस येतो तें पाहून )
का बलें–लडें कोसळें–गालिं ओघळे
धार ही वरुनी
( हाताने दाखवितो ) सुजतिलना डोळे रडुनी–येवढे

( बाळू रडतां रडतां हसतो व कांगवा करूं लागतो. तेव्हां थोडा वेळ थांबून बिस्कीट खात खात—)

जो अमुच्याशीं बोलेल

(मिटक्या मारतो) त्याला हा खाउ मिळेल-गोडसा

(डोळे मिचकावून) जो हसेल..........'

बाळू-(मधेंच) 'हा हसलों मी'

दादा-(त्याच्या पाठींत गुद्दा देऊन)

'घे धम्मक लाडू नामी-हा तुला'

बाळू-(मिस्किलपणें हसून, 'किति गोड लाडु हा दादा!'

दादा-( 'हसला का बोबडकांदा-शेवटीं?'

बाळू-(त्रासून) 'हो चले-हासलो!-असें मी खलें बोबदें बाल'

दादा-(त्याला पोटाशीं धरून) 'छे! अमुचा तूं लडिवाळ-शाहणा'

नागपूर

ता. ११-९-२९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३८७५
REFBK-0003976
REFBK-0003976

समाप्त.

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवि

श्री. भवानीशंकर श्रीधर पंडित यांच्या

कवितांचे संग्रह

# चवथीचा चांद

[ शिशुगीतें ]

किंमत ८ आणे

# पिचलेला पावा

[ भावगीतें ]

किंमत १ रुपया

हीं दोन्ही सुंदर पुस्तकें एकदम मागविणाऱ्यास
टपाल खर्च माफ

पुस्तकासंबंधी सर्व पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

व्यवस्थापक—

मुलांचें मासिक कार्यालय, नागपूर

# मुलांचें मासिक

तुमच्या लहान मोठ्या मुलांमुलींची कर-
मणूक करून त्यांना मार्गदर्शक
होईल वा. व. २ रु.

---

मुलांचें मासिक
कार्यालय,
नागपूर

—